# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०७/२०२४ (शनिवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## वाहनासह एकुण १५,४५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

फिर्यादी पोउपनि संतोष चव्हाण पो.स्टे. बेला व सोबत पोहवा संतेद्र रंगारी, पोशी सूहास मासटवार, चालक पोहवा प्रवीण नैनवार सह मा. अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे आदेशाने उमरेड डीव्हीजन मध्ये अवैध रेती वाहतूक वर कार्यवाही करणेकामी पो.स्टे. उमरेड हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे ०२/४५ वाजता माहिती प्राप्त झाली की, एक १० चक्का टीप्पर क्रमांक MH 40 BL 4311 हे विनापरवाना व कोणतीही रॉयल्टी नसताना अवैध रेती वाहतूक करीत आहे अश्या खबरेवरून स्टाफ यांनी गांगापुर फाटा येथे रात्री ०३/२० वाजता नाकाबंदी करून मिळालेल्या माहितीनुसार एक १० चक्का टीप्पर क्रमांक MH 40 BL 4311 हे गांगापुर फाटा , उमरेड येथे आल्यावर सदर टिप्परची पाहणी केली असता टीप्पर मध्ये एक चालक व क्लिनर बसून दीसले व सदर टीप्पर मध्ये रेती आढळून आली. चालकास रॉयल्टी बाबत विचारणा केली असता चालकाकडे कोणतेही रॉयल्टी नव्हती. चालकास नाव पत्ता विचारले असता त्याने सोमेश्वर रामकृष्ण मानकर ,रा. शालेशहरी, ता. भिवापूर ,जि नागपूर तसेच क्लिनर ला नाव पत्ता विचारले असता त्याने आपले प्रियांशू प्रकाश शेंन्डे, रा. पिपरडोह ,ता. उमरेड , जि. नागपूर असे सांगितले तसेच चालक यास टीप्पर च्या मालकाबाबत विचारले असता मालकाचे नाव नितेश जूनघरे असे सांगितले.तसेच सदर रेती कुठुन आणली बाबत विचारणा केली असता पवनी भंडारा येथून आणल्याचे सांगितले. आरोपीतांकडुन १) १० चक्का टीप्पर क्रमांक MH 40 BL 4311 की.अं.१५,००,०००/—रू २) टीप्पर मध्ये भरलेली अंदाजे ०६ ब्रास रेती की.अं. ३०,०००/—रू ३) आरोपीचा विवो कंपनीचा मोबाईल किंमत अंदाजे की.अ. १५,०००/— रू. असा एकुण १५,४५,०००/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आले. आरोपीतां विरूध्द पोलीस स्टेशन , उमरेड येथे अप. क्र. ३०१/२०२४ कलम ४९, ३०३(२), ३(५) भा. न्या. स., सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ , सहकलम ४ , २१ खान व खनिजे (विकास व अधिनियम ) अधिनियम , सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन यातील दोन आरोपीतांना हे पोलीस स्टेशन उमरेड यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि संतोष चव्हाण पो.स्टे. बेला व सोबत पोहवा संतेद्र रंगारी, पोशी सूहास मासटवार, चालक पोहवा प्रवीण नैनवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर